# सा.बां. अभियंता दौऱ्यावर?



**निफाड। दि.६ प्रतिनिधी**

येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अधिकारी प्र.रा. घोडे यांचे कार्यालय हे निफाड तालुक्यातील रस्त्याच्या कामासंदर्भात येणाऱ्या नागरिकांसाठी 'असून अडचण नसून खोळंबा' या प्रकारात मोडत असल्याची चर्चा तक्रारी घेऊन येणाऱ्या नागरिकांमध्ये होत आहे. शासकीय विश्रामगृहाजवळ असलेल्या घोडे यांच्या कार्यालयातील खुर्ची ही कायम रिकामीच असते व कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे उत्तरही ठरलेले असते, साहेब दौऱ्यावर आहे. परंतु दै. देशदूतने आठही दिवस घोडे यांच्या कार्यालयातील उपस्थितीबाबत त्यांची उपस्थिती बघितली असता घोडे हे कधीही कार्यालयात हजर नसल्याने समस्या घेऊन येणाऱ्या नागरिकांची कुचंबणा होत असते. याकडे सा.बां. विभागातील वरिष्ठ प्रशासन लक्ष देणार का?

# कृषिमंत्र्यांना घेराव घालणार

**शिरवाडे वाकद। वार्ताहर**



केंद्र व राज्य शासनाकडून पंतप्रधान सिंचन योजना राबविली जाते. परंतु नाशिक जिल्ह्यातील ८ हजार ५०० शेतकऱ्यांचे २५ कोटीचे अनुदान रखडले आहे. ऑगस्ट अखेरपर्यंत अनुदान मिळाले नाही तर जयकिसान फार्मर्स फोरम थेट कृषिमंत्र्यांना घेराव घालून तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा फोरमचे विभागीय अध्यक्ष निवृत्ती न्याहारकर व सदस्यांनी जिल्हा कृषी अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे दिला.

ठिबक सिंचन संचाचे २०२३-२४ मधील अनुदान प्रलंबित असून मार्च अखेर मिळणारे ठिंबक व तुषारचे अनुदान दोन वर्षे उलटले तरी अद्याप शेतकऱ्यांना मिळाले नाही. या अनुदानामुळे पाणी, खत, वीज आणि मजुरीत बचत होऊन शेतकऱ्यांना मोठा हातभार लागतो. शेतकऱ्यांनी कर्ज काढून, हात उसणे करुन सूक्ष्म सिंचन संच खरेदी केलेले आहे. सन २०२४-२५ करीताही कृषी खात्याकडून पूर्वसंमती प्राप्त झाली नाही त्यामुळे यावर्षी अनुदानासाठी अर्ज करता येणार नाही. शासनाने 'मागेल त्याला शेततळे' योजना राबवली मात्र त्या योजनेचेही अनुदान प्राप्त झाले नाही. त्यामुळे कृषी योजनांचे अनुदाने लवकरात लवकर मिळावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा जय किसान फार्मर्स फोरम तर्फे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी विवेक सोनवणे यांना निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.याप्रसंगी फोरमचे अध्यक्ष प्रा.डॉ.संजय जाधव, विभागीय अध्यक्ष निवृत्ती न्याहारकर, शाम गोसावी, नाना पाटील, सुरेश बच्छाव, प्रकाश सोनवणे, शिवाजी न्याहारकर, अजिंक्य देशमुख, राकेश शिंदे, राजेंद्र तिडके आदी शेतकरी उपस्थित होते.

# माजी सैनिकांना जीवन गौरव पुरस्कार

**ओझर। दि.६ वार्ताहर**



कारगिल विजय दिनाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त भारतीय माजी सैनिक संघ नाशिक व माजी सैनिक परिवार यांच्या वतीने नाशिक येथील थ्री लिव्हस, आर.डी.सर्कल जवळ गोविंदनगर येथे माजी सैनिकांचा व सैनिक परिवाराचा गौरव सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात झाला.याप्रसंगी सिद्धिविनायक औद्योगिक वसाहतीचे विद्यमान संचालक तथा माजी सैनिक श्रीराम आढाव यांच्यासह तीन माजी सैनिकांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.विरपत्नी, विरमाता व विरपिता तसेच या युद्धात प्रत्यक्ष सहभागी असलेल्या सैनिकांचा विशेष सन्मान करण्यात आला. याबरोबरच सैनिक उद्योजक यांचाही सन्मान करण्यात आला. यावेळी भारतीय सैन्यातुन निवृत्तीनंतरही सैनिक व समाज सेवेसाठी आपले आयुष्य वाहून घेणाऱ्या माजी सैनिकांना जीवन गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा जीवन गौरव पुरस्कार माजी सैनिक श्रीराम आढाव, अजय ओढेकर, विजय पवार यांना देण्यात येवून सन्मानित करण्यात आले. नाशिक मनपाचे माजी सभागृह नेते दिनकर अण्णा पाटील व उद्योजक दीपक चंदे यांना देण्यात आला. सैनिक उद्योजक म्हणून प्रभाकर बडगुजर, समाधान सोनवणे, विजय कातोरे, पी.एम. सैनी, पंडित खांदवे, बलनाथ क्षीरसागर यांचा सन्मान करण्यात आला. विरपत्नी भागुबाई दराडे, रेखा खैरनार, सुषमा मोरे, भारती चौधरी, तेजस्विनी पवार, श्रीमती जयश्री पाटील, तसेच वीर माता सौ.बबुबाई ढाकणे वीर पिता अर्जुन ढाकणे यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमासाठी दीपक बिल्डर्स अॅण्ड डेव्हलपर्स तसेच सागर मोटकरी यांचे सहकार्य लाभले.

# सर्वेश कुशारेच्या पदकासाठी प्रार्थना

**महादेवनगर। वार्ताहर**




पॅरिस ऑलिम्पिकमध्ये उंच उडी क्रीडा प्रकारात भारताचे प्रतिनिधित्व करणारे सर्वेश कुशारेसाठी त्याचे शालेय शिक्षण झालेल्या श्री.डी.आर. भोसले विद्यालयात व जन्मगाव असलेल्या देवगाव गावात मंगळवार (दि.६) प्रार्थना करण्यात आली. यावेळी त्याने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक मिळवून आमच्यासह देशवासियांचे स्वप्न पूर्ण करावे, अशी अपेक्षा विद्यार्थी, गावकरी व सर्वेश कुशारेच्या कुटुंबीयांनी व्यक्त केली.

सर्वेशची ऑलिंपिक स्पर्धेतील प्राथमिक पात्रता फेरी बुधवार (दि.७) भारतीय प्रमाण वेळेनुसार दुपारी १ वाजून ३५ मिनिटांनी होणार आहे. या फेरीत त्याला यश मिळावे व पुढील स्पर्धा जिंकण्यासाठी सर्वेशला पाठबळ आणि प्रोत्साहन मिळावे म्हणून उगवता सुर्य तुम्हाला आशीर्वाद देवो, बहरलेली फुले तुम्हाला सुगंध देवो आणि परमेश्वर आपणांस यशस्वी होण्यासाठी पंखात बळ देवो. आपणास उद्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक मिळावे, हीच ग्रामस्थ व विद्यालय परिवाराकडून अनंत शुभेच्छा अशी प्रार्थना करण्यात आली. यावेळी मंडळ अधिकारी ज्ञानेश्वर पगार, माजी पंचायत समिती सदस्य भाऊसाहेब बोचरे, माजी पोलीस पाटील भास्कर बोचरे, जयवंत लोहारकर, सर्वेशचे वडील अनिल कुशारे, मनोहर बोचरे, राजेंद्र बोचरे, धनजंय जोशी, संपत आढांगळे, सामाजिक कार्यकर्ते वसंत आढांगळे, सचिन गायकवाड, प्राचार्य के.एम. गाजरे, पर्यवेक्षक बी.के. उफाडे आदींसह शिक्षक, ग्रामस्थ उपस्थित होते. उपशिक्षक डी.बी. आहेर यांनी सूत्रसंचालन केले.

> उद्या होणाऱ्या ऑलिंपिक स्पर्धेची विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांना उत्कंठा लागली असून आमच्या श्री.डी.आर. भोसले विद्यालयाचा सर्वेश विद्यार्थी असल्याचा अभिमान आहे. सुवर्णपदक मिळावे यासाठी शिक्षक, ग्रामस्थ, विद्यार्थी यांनी देवाकडे प्रार्थना केली.
>
> ■ भाऊसाहेब बोचरे, अध्यक्ष, शालेय व्यवस्थापन समिती, देवगाव

# कर्तव्याला पुरस्काराची जोड देत जिल्हा परिषदेचा उपक्रम

**लासलगाव। दि.६ वार्ताहर**



विनोबा अॅपच्या माध्यमातून प्रत्येक महिन्यात जिल्ह्यातील विविध शैक्षणिक प्रकल्पातील उपक्रमशील शिक्षकांना पुरस्कार दिले जातात. जि.प. च्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.अर्जुन गुंडे, उपशिक्षणाधिकारी भास्कर कनोज, शिक्षण विस्तार अधिकारी संतोष झोले यांच्या उपस्थितीत जि.प. च्या २२ शिक्षकांना मार्च ते जून २०२४ चे जिल्हास्तरीय विनोबा पुरस्कार प्रदान करण्यात आले. शिक्षकांचे उपक्रम शेअर करणे, शिक्षकांना प्रेरणा देणे, प्रशासकीय माहितीची देवाण-घेवाण करण्यासाठी अॅपसचा प्रामुख्याने उपयोग केला जातो.

**पोस्ट ऑफ द मंथ पुरस्कार**

लालू तुकाराम गारे (जि.प.शाळा पिंपळगाव घा. ता. इगतपुरी), संजय कुमार सुसलादे (जि.प. शाळा शिराळे ता.पेठ), सोमनाथ महादेव ठोंबरे (जि.प. शाळा दुगलगाव ता.येवला), योगेश बाळासाहेब माकोने (जि.प. शाळा कृष्णवाडी ता.येवला), देविदास भिला मोरे (जि.प. शाळा मराठी मुलांची शाळा १ ता.कळवण), जयेश सूर्यवंशी भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा (भोयेगाव ता.चांदवड). पुष्पा बापूराव देसले ८) रत्ना बबन सूर्यवंशी (जि.प.शाळा मानूर ता.कळवण, जि.प. शाळा मुलींची २) कळवण). सुशीला मधुकर चोथवे १०) दीपिका अशोक भालेराव (जि.प. शाळा निनावी, ता. इगतपुरी व भवानी नगर ता. निफाड). माया भिका सोनावणे (जि.प. शाळा भरवीर बु. ता. इगतपुरी), सोनाली पवार (जि.प. शाळा देवळाने ता. येवला), सुजाता कांतीलाल बोरसे (जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाडीवऱ्हे ता. इगतपुरी), वर्षा चौधरी (जि.प. शाळा खंबाळे ता. इगतपुरी), राहुल धुमाळ (जि.प. शाळा खंबाळे ता. इगतपुरी), जयश्री कृष्णा येवले (जि.प. शाळा रावलगाव ता. मालेगाव), अनिल भामेरे (जि.प. शाळा लांडगेबेट ता. बागलाण), सुरेखा तुकाराम साबळे (जि.प. शाळा नादुरकीपाडा ता. त्र्यंबकेश्वर).

**स्पोकन इंग्लिश कार्यक्रम**

प्रवीण विंचू (जि.प. शाळा पिंपळखुटे), रेखा आंबेकर, माधुरी आहिरे (जि.प. शाळा भा.नगर व ढांगमक्राई ता.बागलाण), विद्या पाटील (जि.प. शाळा वाकी ता. इगतपुरी). शिक्षणाधिकारी प्राथमिक डॉ.नितीन बच्छाव यांनी शिक्षकांचे अभिनंदन केले.

# निफाडला मनसे आढावा बैठक

**निफाड।** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संस्थापक अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशानुसार महाराष्ट्रात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तालुकानिहाय आढावा बैठका मनसेच्या वतीने राज्यभर घेण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने निफाड विधानसभा आढावा बैठक निफाड शासकीय विश्रामगृहामध्ये प्रदेश नेते तथा पक्ष निरीक्षक राजू उंबरकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्रदेश उपाध्यक्ष अशोक तावरे, प्रदेश उपाध्यक्ष अॅड.रतनकुमार इचम, नाशिक जिल्हा अध्यक्ष प्रकाश गोसावी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. या आढावा बैठकीत मनसेच्या वतीने निफाड विधानसभेसाठी पक्षाच्या वतीने पक्षाचा कोणता उमेद्वार सक्षम आहे, यावर चर्चा होत पक्षात इच्छुक उमेद्वार नसेल तर आयात उमेद्वार पक्षाच्या हितासाठी योग्य ठरेल का, यावर साधक-बाधक चर्चा होत निफाड विधानसभेसाठी मनसेच्या वतीने जोरदार तयारी करण्याचे आवाहन याप्रसंगी नाशिक जिल्हा अध्यक्ष प्रकाश गोसावी यांनी केले. तसेच पक्षवाढीसाठी सर्वांनी झोकून द्यावे व राज ठाकरेंचे विचार घराघरात पोहचावे, असे प्रतिपादन अॅड. रतनकुमार इचम यांनी कार्यकर्त्यांना व उपस्थितांना मार्गदर्शन करतांना केले. बैठकीसाठी मनसे उपजिल्हा अध्यक्ष बालेश जाधव, मनसे निफाड तालुका अध्यक्ष संजय मोरे, सरचिटणीस अब्दुल शेख, माजी तालुका अध्यक्ष शैलेश शेलार, तुषार गांगुर्डे, केशवराव वाघ, अमित गंभीरे, आशुतोष सूर्यवंशी, जयेश ढिकले, योगेश पटेल आदी उपस्थित होते.

## प्रा.शालिनी पाटील यांना पीएच.डी.

**करंजी खुर्द।** श्री स्वामी षटकोपाचार्यजी महाराज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सायखेडा येथील मराठीच्या प्राध्यापिका श्रीमती शालिनी पाटील यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवी संपादन केली. त्यांना प्रा.डॉ.तुषार चांदवडकर, प्राचार्य डॉ.एस.एस. काळे यांचे मार्गदर्शन लाभले. मविप्र सरसिटणीस अॅड.नितीन ठाकरे व निफाड तालुका संचालक शिवा पाटील गडाख, प्राचार्य डॉ.एस.ए. खैरनार, उपप्रचार्य डॉ.एस.व्ही. गोसावी आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

# संत नामदेव मंडळाच्या वतीने विविध कार्यक्रम

**चांदोरी। दि.६ वार्ताहर**

सालाबादप्रमाणे सायखेडा येथे संत नामदेव युवक मंडळ व शिंपी समाजातर्फे दरवर्षी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करत यामध्ये पारायण, किर्तनासह विविध प्रकारचे धार्मिक संस्कार या कार्यक्रमाच्या माध्यमातून भाविकांवर होत कार्यक्रमाची रेलचेल होत असते. दि.२७ जुलै ते ३ ऑगस्ट पर्यंत याच अनुषंगाने विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले.

हरिकिर्तन महोत्सवाची ही ५८ वर्षांची परंपरा या मंडळाच्या वतीने सुरू आहे. दि.२७ रोजी सकाळी विणापूजन, संत नामदेव महाराज गंगामाता पूजनाने सुरुवात करून दररोज दुपारी २ ते ५ पर्यंत महिलांचे सामुदायिक ज्ञानेश्वरी पारायण ठेवण्यात आले होते. सात दिवस चालणाऱ्या पारायणासाठी महिला व पुरुष बसले होते. सप्ताह काळात हरिपाठ ६.३० ते ७.३० आणि नंतर रात्री हरिकिर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. आठ दिवस वेगवेगळ्या थोर संत महात्म्यांची कीर्तन व प्रवचन ठेवण्यात आली होती. शुक्रवार (दि.२) सायंकाळी ४ ते ७ पर्यंत श्री संत नामदेव महाराजांचा पालखी सोहळा नगर प्रदक्षिणेसाठी समाजातील व गावातील भाविक मंडळींनी सहभाग घेतला. पालखी गंगादर्शन करुन झाल्यावर पाच ओव्या व संत एकनाथांच्या ओव्या वाचनानंतर दीपोत्सव साजरा होऊन आरती झाली.

गावातील, समाजातील व भाविक मंडळींनी पारायणास बसलेल्या मंडळींसाठी, महिलांसाठी ग्रंथराज ज्ञानेश्वरी ग्रंथ वाटण्यासाठी लकी ड्रॉ काढुन पैसे जमवलेले खर्च करून २५ ग्रंथ महिलांना वाटप करण्यात आले. तसेच रामेश्वर गायकवाड यांनी लकी ड्रॉ ने नावे काढुन महिलांना पाच पैठण्या दिल्या. समाजातील गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थीनींना बक्षिसे वाटण्यात आली. शनिवार (दि.३) सकाळी १० ते १२ वाजेदरम्यान काल्याच्या किर्तनाने सांगता होऊन १ ते ३ पर्यंत महाप्रसादास आर्थिक सहाय्य राजेंद्र मारूती नवले यांनी केले. समाजातील सर्व भाविकांच्या सहकार्याने व भाविकांच्या उपस्थितीत कार्यक्रम झाला.


# कर्मवीरांच्या स्मृतिंना प्रणाम



कर्मवीर शिवराम दादाजी हिरे

समाजवादी चळवळीचे झुंजार नेते, शेतकरी आणि गोरगरीबांचे कैवारी,
सहकार चळवळीतले तपस्वी स्वर्गीय आमदार

**कर्मवीर शिवराम दादाजी हिरे**

यांची आज ३२ वी पुण्यतिथी व १११ वी जयंती आहे.

**बोले तैसा चाले या तत्वाने वागणाऱ्या कर्मवीरास आमचे विनम्र अभिवादन!**

श्री. विठ्ठलराव भगवान कदम
मुख्याध्यापक

माजी मुख्याध्यापक : श्री. सुनिल परशराम हिरे

उपशिक्षक : श्री. अपसर अजीज मन्सुरी, श्री. विजय भागचंद हिरे,
श्री. समाधान वाल्मिक अहिरे, श्री. सत्यकाम बाबुराव बिडगर, श्री. शिवाजी कृष्णाजी सुर्यवंशी,
श्री. नीलेश निंबा हिरे, श्री. सचिन जिभाऊ भालेराव, श्री. देवेंद्र कैलास दाभाडे,
श्री. नितीन मधुकर पारखे, श्री. योगेश अशोक काळे, श्री. सुरेश गोविंदराव हिरे,
श्री. नानाभाऊ कडू अहिरे, श्री. सुरेश दौलत मोरे.

शिपाई : श्री. अनिल दशरथ शेवाळे, श्री. वाल्मिक निंबा बावीस्कर

**कर्मवीर शिवराम दादाजी हिरे माध्यमिक विद्यालय, निंबायती, ता. मालेगाव**